**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 07.05.2025** **वार- बुधवार**

---

**सराव**

युद्धजन्य परिस्थितीत नागरिकांनी काय काळजी घ्यावी याची माहिती प्रात्यक्षिकासह देण्यासाठी पुण्यात विधान भवन, पुणे महानगर पालिका आणि वनाज कंपनी या ठिकाणी संयुक्त सराव अर्थात mock drill घेण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, अग्निशमन दल, पोलिस विभाग, आरोग्य विभागाच्या रुग्णवाहिका सहभागी झाले होते. याव्यतिरिक्त, मुळशी नगर पंचायत, तळेगाव नगर पंचायत आणि पिंपरी महापालिका या ठिकाणीगी संयुक्त सराव पार पडला.

**जल्लोष**

पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या ठिकाणांवर केलेल्या ऑपरेशन सिंदुरबद्दल आनंद व्यक्त करणारा जल्लोष पिंपरी चिंचवड शहरातही पाहायला मिळाला. पिंपरी चिंचवड भारतीय जनता पक्ष कार्यालयामध्ये कार्यकर्त्यांनी तिरंगा फडकवत, भारत माता की जय अशा घोषणा देत आनंद व्यक्त केला. शहरातील भक्ती शक्ती चौकात अनेक तरुणांनी एकत्र येत जवानांच्या शौर्याला मानवंदना दिली तसंच चिंचवड गावठाणमध्ये ढोल ताशा पथकानं गजर करत आनंद व्यक्त केला.

पुणेकरांच्या वतीनं श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची महाआरती करण्यात आली. यावेळी संपूर्ण परिसर "भारत माता की जय!", "वंदे मातरम!" च्या घोषणांनी दणाणून गेला होता. यावेळी कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने म्हणाले की, भारतावर कोणताही भ्याड हल्ला झाला, तर त्याला सडेतोड उत्तर देण्याची ताकद भारताकडं आहे हे भारतीय सैन्याने दाखवून दिलं आहे.

**प्रतिक्रिया**
भारतीय सैन्य दलानं पाकव्याप्त काश्मीरमध्ये केलेला हल्ला ही योग्य कृती असल्याची प्रतिक्रिया प्रगती जगदाळे यांनी दिली. प्रगती जगदाळे या पहलगाम हल्ल्यात मृत झालेल्या संतोष जगदाळे यांच्या पत्नी आहेत. दहशतवादाची पाळमुळं उखडून टाकावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**प्रतिक्रिया**
पाकिस्तानमध्ये भारतानं नऊ ठिकाणी ऑपरेशन सिंदूरद्वारे हवाई हल्ला केले. पहलगाम इथं झालेल्या हल्ल्याचं सडेतोड प्रत्युत्तर भारतानं दिलं आहे. यावर आज पुण्यात पत्रकारांशी  बोलताना शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांचं कौतुक केलं. सरकार कोणतीही भूमिका घेत असताना राजकारण न आणता पूर्ण ताकदीनं सरकारच्या पाठिमागे उभं राहिलं पाहिजे असं आवाहन शरद पवार यांनी केलं.

**देवळाणकर**

भारतीय सैन्य दलानं पाकव्याप्त काश्मीरमध्ये 9 दहशतवादी तळ नष्ट करून पाकिस्तानला मोठा संदेश दिला आल्याची प्रतिक्रिया आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली आहे. यावेळी भारतीय सैन्य दलानं पाकव्याप्त काश्मीरपर्यंत सीमित न राहता पाकिस्तानमधील तळांवरही हल्ले केले. पाकिस्तान दहशतवादी संघटनांना संरक्षण देण्यास सक्षम नाही असा संदेश या कारवाईच्या माध्यमातून देण्यात आल्याचं देवळाणकर म्हणाले.

**प्रतिक्रिया**

पुण्यातील अग्रवाल मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्सद्वारे ऑपरेशन सिंदूर मोहिमेचं समर्थन करण्यात आलं. भारतीय सैन्यदलाच्या शौर्य आणि समर्पणाचा आम्हाला अभिमान आहे. आम्ही पूर्णपणे आपल्या सैन्याच्या पाठीशी उभे आहोत. तसंच, देशाच्या सुरक्षिततेसाठी कणखर नेतृत्व करणारे माननीय पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांचेही आम्ही मन:पूर्वक समर्थन करतो असं चेंबरचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश अग्रवाल यांनी सांगितलं.

**बस**

दरवर्षी विना अपघात सेवा बजावणाऱ्या चालकांना रोख रक्कम देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते एस टी महामंडळाच्या 307 व्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये बोलत होते. प्रवाशांच्या सुविधेसाठी राज्यातील 204 बस स्थानकावर एटीएम केंद्र सुरू करण्यात येणार आहेत अशी माहिती सरनाईक यांनी दिली.

**निवडणूक**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यात घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. पुणे महापालिकेची आगामी निवडणूक चार सदस्यीय प्रभाग रचनेनुसार होणार आहे. मात्र पुणे महापालिकेतून उरुळी देवाची आणि फुरसुंगी ही दोन गावं वगळल्यामुळं प्रभाग रचना नव्यानं करावी लागणार आहे. पुण्यात प्रभाग संख्या 42 राहणार असून, नगरसेवकांची संख्या 166 राहणार आहे.

**वझे**

अभिनेता, दिग्दर्शक, नाट्यगुरू आणि नाट्य समीक्षक माधव वझे यांचं आज सकाळी पुण्यात निधन झालं. ते 85 वर्षांचे होते. साने गुरुजी यांनी लिहिलेल्या श्यामची आई या कादंबरीवर आधारित आणि प्रल्हाद केशव अत्रे यांनी दिग्दर्शित केलेल्या श्यामची आई या चित्रपटात माधव वझे यांनी "श्याम" ची प्रमुख भूमिका रंगवली होती. पुण्याच्या वाडिया महाविद्यालयातून इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झालेल्या माधव वझे यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत देखील आपल्या अभिनयाची छाप पाडली होती. अनेक नाट्यकर्मींची व्यक्तिचित्रणं असलेलं रंगमुद्रा, श्यामची आई, आचार्य अत्रे आणि मी हे आठवणींवर आधारित पुस्तक, लहान मुलांसाठी नंदनवन, समांतर रंगभूमी - पल्याड- अल्याड अशी काही ग्रंथसंपदा वझे यांच्या नावावर आहे. वझे यांच्या रंगमुद्रा आणि प्रायोगिक रंगभूमी - तीन अंक या ग्रंथाला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. राज्य नाट्य स्पर्धेमध्ये उत्कृष्ट अभिनयासाठी त्यांना पदकं मिळाली होती. भारतीय आणि पाश्चात्य प्रथितयश नाटककारांच्या नाटकांच्या प्रयोगांचं दिग्दर्शन त्यांनी केलं होतं.

आंतरराष्ट्रीय नाट्य समीक्षक संघाचे ते सभासद होते. संघाच्या देश-परदेशातील अधिवेशनांमध्ये वझे यांनी अनेक शोधनिबंधही सादर केले होते.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**